जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १७० | रविवार, ११ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### गावठी कट्टा घेऊन फिरणाऱ्या गुन्हेगाराला अटक

**पुणे, ता. १० :** पूर्वीच्या गुन्ह्यातून आपल्याला हल्ला होईल, या भितीने स्वसरंक्षणासाठी शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली आहे. अभिषेक कैलास दांगट (वय १९, रा. वृंदावन विश्व, तानाजी नवले इंडस्ट्रीज नऱ्हे रोड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून गावठी कट्टा व एक जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आले आहे. भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तपास पथक हे पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी पथकाला नवले पुलाकडून कात्रजकडे येणाऱ्या मुख्य रोडवरील राजमाता उदयानसमोरील बाजुच्या सर्व्हिस रोडवर एक जण शस्त्र घेऊन थांबला आहे. अशी माहिती एका खबऱ्यामार्फत मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सापळा रचला. तेव्हा आरोपी अभिषेक दांगट हा सापळ्यात अलगत अडकला. आरोपीची झडती घेतली असता त्याच्याजवळ ५० हजार रुपयांचे गावठी कट्टा व एक जिवंत काडतुस जप्त करण्यात आला.

# पुण्यात मेट्रो, पीएमपी मोफत, करमाफीसह आश्वासनांची खैरात

## पुणे महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचा जाहीरनामा प्रसिद्ध


**संतोष मुंडे**

पुणे, ता. १० : पुणे महानगरपालिका निवडणुकीस अवघे पाच दिवस उरले असताना राजकीय वातावरण तापले असून प्रचाराला वेग आला आहे. काँग्रेस आणि भाजपनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसनेही पुणे महापालिकेसाठी आपला संयुक्त जाहीरनामा जाहीर केला आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचा हा जाहीरनामा शनिवारी (ता.१०) पुण्यात प्रसिद्ध करण्यात आला.

जाहीरनामा प्रकाशनाच्या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, खासदार अमोल कोल्हे उपस्थित होते. या जाहीरनाम्यातून राष्ट्रवादीने पुणेकरांसाठी अनेक मोठी आणि धाडसी आश्वासने जाहीर केली असून, आगामी पालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी भरमसाठ आश्वासनांची खैरात केल्याचे चित्र दिसून येत आहे.

यावेळी बोलताना अजित पवार यांनी पुणेकरांना मोफत मेट्रो आणि मोफत पीएमपीएल बससेवेचे आश्वासन दिले. पुण्यातील वाहतूक कोंडी आणि खराब रस्त्यांमुळे दररोज कोट्यवधी रुपयांचे इंधन वाया जात असल्याचे सांगत, हा खर्च मेट्रो प्रवासासाठी वापरता येईल, असा आमचा मोठा प्लॅन आहे, असे त्यांनी नमूद केले. पीएमपीएल बस आणि मेट्रोचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्यास रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी होईल आणि त्यामुळे पुणे प्रदूषणमुक्त होऊ शकते, असा दावाही त्यांनी केला आहे.

अजित पवार पुढे म्हणाले, महापालिकेची सत्ता आमच्या हाती दिली, तर मी मोफत मेट्रो करून दाखवीन, असे ठाम आश्वासन अजित पवार यांनी दिले आहे. तसेच आम्ही पुण्यात राहणारे आहोत, त्यामुळे पुणेकरांबद्दल आम्हाला जिव्हाळा आहे. बाहेरचे लोक आले तर ते तात्पुरतेच येतील, असे म्हणत त्यांनी



महायुतीतील मित्र पक्षांवर अप्रत्यक्ष टोला लगावला.

राष्ट्रवादी काँग्रेस ने जाहीर केलेल्या जाहीरनाम्यात शहराच्या पाणीपुरवठ्याबाबतही मोठी आश्वासने देण्यात आली आहेत. शहरातील सर्व प्रभागांतील नळांमधून दररोज उच्च दाबाने पाणीपुरवठा केला जाईल, टँकरची समस्या कायमची संपवली जाईल, तसेच पीएमसीच्या सर्व ४१ प्रभागांमधील पाणीपुरवठ्याच्या वेळा काही महिने आधीच जाहीर केल्या जातील, असे राष्ट्रवादीने म्हटले आहे.

याशिवाय १ एप्रिल २०२६ पासून मध्यमवर्गीयांच्या मालकीची ५०० चौरस फुटांपर्यंतची घरे पूर्णपणे मालमत्ता करमुक्त केली जातील, असेही आश्वासनही देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना डेटा प्लॅनसह मोफत टॅब्लेट, पुणे महानगरपालिकेच्या अखत्यारीत वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना, स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याचाही समावेश राष्ट्रवादीच्या जाहीरनाम्यात करण्यात आला आहे.

दरम्यान, पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेसने पुणेकरांचा अधिकारनामा तर भाजपने संकल्पपत्र प्रसिद्ध केले आहे. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात काँग्रेसचा कार्यकाळ - पुण्याचा सुवर्णकाळ अशी टॅगलाईन देत, यूपीए सरकारच्या काळात जेएनएनयूआरएम योजनेतून पुण्यासाठी आलेल्या निधीचा आणि विकास कामांचा उल्लेख केला आहे. या जाहीरनाम्यातून बस खरेदी, रस्त्यांचे रुंदीकरण व काँक्रिटीकरण, पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थेसाठी केलेल्या कामांची आठवण करून देण्यात आली आहे. तसेच या जाहीरनाम्यात मागील दहा वर्षांत भाजपने पुणेकरांची ६ लाख कोटी रुपयांची लूट केल्याचा आरोपही काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

भाजपच्या संकल्पपत्रात २०१४ मध्ये केंद्र सरकारने मेट्रोला दिलेली मंजुरी, पुणे विमानतळ विस्तार करणे, तसेच २०४७ पर्यंतच्या भारताच्या विकास आराखड्याशी सुसंगत पुण्याच्या मास्टर प्लॅनवर भर देण्यात आला आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांच्या माध्यमातून शहराचा विकास साधण्याचा दावा भाजपने केला आहे. एकूणच पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिन्ही प्रमुख पक्षांनी जाहीरनाम्यांच्या माध्यमातून पुणेकरांसमोर विकासाच्या मोठ्या वचनांचा पाऊस पाडला असून, मतदार कोणाच्या आश्वासनांवर विश्वास ठेवतात, हे निकालातून स्पष्ट होणार आहे.

### फ्रीजचा स्फोट होऊन एकाच कुटुंबातील ३ जणांचा मृत्यू

**मुंबई, ता. १० :** गोरेगाव पश्चिम येथील एका इमारतीत आग लागल्याची घटना शनिवारी (ता. १०) पहाटे घडली आहे. या अग्निकांडात जणांचा गुदमरून मृत्यू झाला, ज्यात २ पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. अग्निशमन दलाने आग विझविली असली तरी, आगीचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. या दुर्दैवी घटनेबद्दल नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे. हर्षदा पावसकर (वय १८), कुशल पावसकर (वय १२) आणि संजोग पावसकर (वय ४८) अशी मृतांची नावं आहेत. गोरेगाव पश्चिमेकडील भगतसिंगनगर येथील इमारतीमधील तळमजल्यावरील घरात आग लागली. फ्रीजचा मोठा स्फोट होऊन ही आग लागली. प्रथम आग तळमजल्यावरील विद्युत वायरिंग आणि घरगुती वस्तूंपर्यंत मर्यादित होती, मात्र ती पसरली आणि पहिल्या मजल्यावरील एका खोलीतील तीन लोकांच्या कपड्यांना आग लागली. दरम्यान, पहाटेच्या सुमारास ही आग लागली तेव्हा सगळेच गाढ झोपेत होते. मात्र आग लागल्याचे समजताच इमारतीतील नागरिकांनी फायर ब्रिगेडला फोन केला. तसेच ते जवान घटनास्थळी पोहोचेपर्यंत स्थानिकांनी बादल्यांमधून पाणी ओतत आग विझविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विजेचे कनेक्शन बंद करून फायर ब्रिगेडच्या जवानांनीही आगीवर नियंत्रण मिळवत ती पूर्णपणे विझविली. परंतु, या आगीत तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

# ‘एका एकरातील आल्यातून १० लाखांचे उत्पन्न’

## इंदापूरच्या भारत शिंदे यांची मेहनत फळाला; शेतकऱ्यांसाठी नवा आदर्श

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १० : येथील सावतामाळी नगर परिसरातील भारत शिंदे हे नाव आज परिसरातील शेतकरयाची सध्या गावात एकच चर्चाय हा शेतकरी सध्या अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती येथे कॅशियर म्हणून दीर्घकाळ सेवेत राहिल्यानंतर त्यांनी निवृत्तीनंतर जीवनातील नवा अध्याय सुरू करण्याचे ठरवले आणि ते थेट शेतीत उतरले. कमी पाण्यावर येणारं नगदी पीक म्हणून भारत शिंदे यांनी एका एकरात आल्याची लागवड केली. आता ते एकरी १० लाख रुपयांचं विक्रमी उत्पन्न कमावतायत. मातीशी असलेली ओळख, शेताशी असलेलं नातं, आणि काहीतरी नवीन करून दाखवण्याची इच्छा या भावनांम धूनच त्यांच्या कृषीप्रवासाची सुरुवात



झाली.

शेतीकडे पाहताना त्यांनी सर्वप्रथम जमिनीची क्षमता, परिसरातील हवामान, पाण्याची उपलब्धता आणि बाजारपेठेच्या गरजा यांचा अभ्यास केला. ऊस हे पारंपरिक, पण पाणीखाऊ पीक बाजूला सारून त्यांनी औरंगाबादी आले या नगदी पिकावर भर दिला. आले हे पिक एकीकडे परिश्रम व व्यवस्थापन मागते, पण योग्य तंत्रज्ञान आणि मातीची योग्य तयारी केली, तर ते चांगले आर्थिक उत्पन्न देऊ शकते यावर त्यांचा विश्वास होता.

शिंदे यांनी मुरमाड आणि निचरा होणाऱ्या जमिनीची निवड केली. जमिनीची दोनदा नांगरट, दोनदा फणसणी करून ती भुसभुशीत केली. सेंद्रिय खतांचा विपुल वापर करून त्यांनी जमिनीची सुपीकता वाढवली. साडेचार फुटांच्या अंतराने उथळ सरी सोडून बेड तयार केले आणि या बेडवर आलेची लागवड करण्यात आली. एकरी खर्च तब्बल २ लाखांच्या घरात गेला, परंतु पीक व्यवस्थापनात त्यांनी कुठेही तडजोड केली नाही. चांगले उत्पन्न मिळाल्याने १० लाखांचे उत्पन्न निघण्यास मदत झाली.

शिंदे यांची ही कहाणी म्हणजे केवळ पिकाच्या यशाची गोष्ट नाही, तर एक निवृत्तीनंतर केलेल्या शेती प्रयोगाची आहे.शेतीच्या भावांमुळे एकीकडे राजकीय वातावरण तापत असताना स्वतः एखादा प्रयोग करून पाहावा असं वाटण्या मागची ही गोष्टय. त्यांच्या शेताला आज परिसरातील अनेक शेतकरी भेट देत आहेत. आले पिकाची लागवड, व्यवस्थापन, बाजारपेठेची माहिती आणि पाण्यावरील बचत याबाबत ते मार्गदर्शन घेत आहेत.

दरम्यान, भारत शिंदे यांचा अनुभव स्पष्ट सांगतो शेतीत नियोजन, योग्य पीक निवड आणि बाजाराची जाण असेल, तर कमी क्षेत्रातही मोठे यश मिळवणे शक्य आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे इंदापूर तालुक्यातील व शहरातील आसपासच्या परिसरात आले पिकाबद्दल नवीन उत्सुकता निर्माण झाली आहे.

# पतंग उडवताना सहाव्या मजल्यावरून पडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**पुणे, ता. १० :** कात्रजमधील आंबेगाव खुर्द परिसरात पतंग उडवित असताना सहाव्या मजल्यावरून पडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अर्धवट बांधकाम सुरू असलेल्या इमारतीतील जिन्यांना सुरक्षेसाठी कठडे नसल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले असून, संबंधित बांधकाम व्यावसायिकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत मुलाचे नाव श्लोक नितीन बांदल (वय १२ रा. स्वरा क्लासिक इमारत, सिद्धिविनायक सोसायटी, आंबेगाव खुर्द, कात्रज) असे आहे. याप्रकरणी श्लोकचे मामा अमोल सुभाष इंगवले (वय-३५, रा. औंदुबर निवास, कात्रज गावठाण) यांनी आंबेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या




माहितीनुसार, आंबेगाव खुर्द येथील एका गृहप्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. या प्रकल्पाच्या शेजारील सोसायटीत बांदल कुटुंब वास्तव्यास आहे. श्लोक इयत्ता पाचवीत शिकत होता. त्याचे वडील खासगी कंपनीत कार्यरत आहेत. गुरुवारी (ता. ८) शाळा सुटल्यानंतर सायंकाळी सुमारे पाच वाजता श्लोक पतंग उडविण्यासाठी जवळील बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत गेला. यावेळी सहाव्या मजल्यावर तोल गेल्याने तो खाली पडला आणि गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सहायक पोलीस निरीक्षक भोजलिंग दोडमिसे यांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने, गुन्हे शाखेचे निरीक्षक गजानन चोरमले आणि सहायक निरीक्षक भोजलिंग दोडमिसे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. चौकशीत इमारतीचे काम सुरू असून जिन्यांना कोणतेही संरक्षक कठडे नसल्याचे निष्पन्न झाले. बांधकाम व्यावसायिकांच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक भोजलिंग दोडमिसे करत आहेत.

# उरुळी कांचन येथील प्रियदर्शनी महिला पतसंस्थेच्या संचालक मंडळावर गुन्हा

**उरुळी कांचन, ता. १० :** लेखापरीक्षणाच्या वार्षीक तपासणीत कुठलाही लेखा जोखा सादर केला नसल्याने उरुळी कांचन (ता. हवेली) येथील प्रियदर्शनी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा, उपाध्यक्षा, सचिव, सर्व संचालक व व्यवस्थापक यांच्यावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र सहकारी सोसायटी अधिनियम १९६० अंतर्गत कलम १४२ (ग) कायद्यान्वये हि कारवाई करण्यात आली आहे.

त्यानुसार पतसंस्थेच्या अध्यक्षा रंजना बाळासाहेब शिवरकर (रा. रेल्वे स्टेशनजवळ, तुपे वस्ती, उरुळी कांचन), हेमलता बाळासाहेब बडेकर (रा. बडेकर नगर, तुपे वस्ती, उरुळी कांचन), रंजना साहेबराव खेडेकर (सचिव, रा. खेडेकर मळा, उरुळी कांचन), संचालिका जयश्री जयप्रकाश





बेदरे (रा. आश्रम रोड, उरुळी कांचन), चंद्रलेखा जनार्दन मचाले (रा. डाळिंब- दत्तवाडी, ता. दौंड), शोभा पुंडलिक शिवरकर (रा. तुपे वस्ती, उरुळी कांचन, सुनीता एकनाथ काळे (रा. शिंदवणे रोड, तळवाडी, उरुळी कांचन), ज्योती सुरेश धुकटे ( रा. उरुळी कांचन), निलम नरेंद्र काटे (रा. तुपे वस्ती, उरुळी कांचन), निलोफर हमजू सय्यद, (रा. तुपे वस्ती, उरुळी कांचन), सुरेखा राजेंद्र कांचन (रा. उरुळी कांचन), विजय भागचंद तलरेजा (व्यवस्थापक, रा. दातार कॉलनी, उरुळी कांचन, ता. हवेली) अशी अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी आर्थिक गैरव्यवहारा मुळे गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या या पतसंस्थेच्या लेखापरीक्षणासाठी नियुक्त केलेल्या व अप्पर विशेष लेखापरीक्षक वर्ग (२), सहकारी संस्था, स्वारगेट, पुणे यांच्या अधीनस्त असलेल्या लेखा परीक्षक अस्मिता प्रकाश पंडित (वय-४४, रा. थेरगाव, पुणे ३३) यांनी उरुळी कांचन पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आर्थिक गैरव्यवहारामुळे गेल्या अनेक वर्षांपासून उरुळी कांचन येथील प्रियदर्शनी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था बंद पडली आहे. या सर्वांनी २१ जुलै २०२५ ते ०७ जानेवारी २०२६ पर्यंत संस्थेचे दप्तर तपासणीसाठी वारंवार पत्रव्यवहार करीत मागूनही न दिल्यामुळे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक मीरा मटाले करीत आहेत.

# थेऊर येथील मुळा–मुठा नदीपात्रात उडी मारुन महिलेचा आत्महत्या करण्याच्या प्रयत्न

## लोणी काळभोर पोलीसांनी प्रसंगावधान दाखविल्याने वाचले प्राण

**लोणी काळभोर, ता. १० :** थेऊर कोलवडी रस्त्यावरील मुळा-मुठा नदीपात्रात उडी मारुन आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका महिलेचे प्राण वाचविण्यात लोणी काळभोर पोलीसांना यश आले आहे. लोणी काळभोर पोलिसांनी आज कार्यतत्परता दाखवून समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

कोलवडी (ता. हवेली, जि. पुणे) येथील एका २६ वर्षीय विवाहितेचे प्राण वाचविण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, थेऊर पोलीस चौकीत शुक्रवारी (ता.९) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास एक इसम धावत आला. त्याने घाबरलेल्या अवस्थेत थेऊर-कोलवडी नदीच्या पुलावरून एक महीला जीव देण्याच्या मनस्थित उभी आहे. अशी माहिती पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच, पोलीस हवालदार वैशाली नागवडे, बीट मार्शल प्रसाद ताम्हाणे, अंकुश घुले हे त्वरित थेऊर कोलवडी नदी पुलावर गेले. तेव्हा तेथे एक महीला नदीपात्रात उडी मारुन आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेचे दिसुन आले. पोलिसांनी प्रसंगावधान राखत महिलेची समजूत काढली. आणि तिचे मत परीवर्तन करून बाजूला घेतले. संबंधित महिलेला ताब्यात घेतले.

संबंधित महिलेला पोलीस ठाण्यात आणल्यानंतर तिला तिचे नाव व पत्ता विचारला. तेव्हा तिने तिचा नाव व पत्ता सांगितला. त्यानंतर त्यांच्या पतीला



पोलीस ठाण्यात बोलाऊन घेतले. त्या दोघांकडे आत्महत्या करण्याचे कारण विचारले असता, त्या महीलेने आर्थिक अडीअडचणीमुळे आत्महत्या करण्याकरीता गेले असल्याचे सांगितले.

दरम्यान, महीलेचे आत्महत्या करण्याचे कारण समजल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के व महीला पोलीस हवालदार वैशाली नागवडे यांनी त्या दोघांचे समुपदेशन केले. व त्यांना जीव देण्यापासुन परावृत्त केले. संबंधित महिलेला तिचे पतींच्या ताब्यात देऊन सुखरुप घरी पाठविले. महीला पोलीस हवालदाराने कर्तव्य तत्परता दाखवुन एक महीलेचा जीव जाणे पासुन वाचविलेला आहे. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सदरची कामगिरी पोलीस पोलीस उप आयुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, पोलीस उप निरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस हवालदार वैशाली नागवडे, पोलीस शिपाई प्रसाद ताम्हाणे, अंकुश घुले, रुपाली कदम, माधुरी खोमणे, निखील मेमाणे, वैभव खोत, निकिता पोळ यांनी केली आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील कारभारी बदला; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन

**पिंपरी, ता. १० :** पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कामांमध्ये भ्रष्टाचार, निविदेतील रिंग, श्वानाच्या नसबंदीतील घोटाळे, डांबरी रस्त्यावर सिमेंट कोणी टाकले. लाच प्रकरणात स्थायी समिती अध्यक्षाला अटक झाली. कोयता गँगने शहरात हैदोस घातला. अशा अनेक गोष्टी शहरात घडल्या आहेत. या सत्ताधाऱ्यांच्या राजवटीवर काहीही बोलणार नाही. पण, यात सुधारणा करण्यासाठी शहरातील कारभारी बदला, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील शिवसेना (शिंदे) पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ कॉलद्वारे नागरिकांशी संवाद साधला. ते म्हणाले, महाराष्ट्राच्या प्रगतीला गतीमान करणारे पिंपरी-चिंचवड शहर आहे. शिवसेना विकासाचा अजेंडा घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहे.

शहरात बदल, परिवर्तन घडविण्याची, कारभारी बदलण्याची वेळ आली आहे. इतिहास टक्कर देणाऱ्यांचाच लिहिला जातो, तडजोड करणाऱ्यांचा नाही. त्यामुळे कोणालाही घाबरू नका आणि बिनधास्त लढा. गेल्या तीन वर्षांपासून माझ्यावर सातत्याने टीका होत आहे. शिव्याशाप दिल्या जात आहेत. त्यामुळे तुम्हीही संयम ठेवा. हाल होतील, पण हार होणार नाही. सत्याला त्रास होतो, पण सत्य कधीही पराभूत




होत नाही. शिवसेना स्वबळावर लढत असून तिला कोणीही हलक्यात घेऊ नये.

सत्तेत आल्यानंतर शास्ती कर माफ केला. बाधित शेतकऱ्यांना साडेबारा टक्के परतावा दिला. मला काय मिळाले? यापेक्षा लोकांना काय दिले? हे महत्त्वाचे आहे. आम्ही शब्द देऊन थांबत नाही, तर तो पाळतोही. एकदा शिवसेनेच्या हाती सत्ता देऊन दाखवा, विकासाचे कुलूप उघडून दाखवतो. शहरात भगवे वादळ आले असून शिवसेना किंगमेकरच्या भूमिकेत दिसेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

सांडपाणी निचऱ्यासाठी ५२ कोटींचा निधी दिला आहे. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी १५३ कोटींची योजना मंजूर केली. पवना जलवाहिनी प्रकल्प राबविला जाणार आहे. नागरिकांना दररोज पाणीपुरवठा केला जाईल. पवना-मुळा-इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणार आहे. समाविष्ट भागातील अर्धवट डीपी रस्ते पूर्ण केले जातील. चुकीचा डीपी दुरुस्त केला जाईल. वाकड-हिंजवडी वाहतूक कोंडी सोडविणार आहे. चापेकर स्मारकासाठी ६८ कोटींचा आराखडा मंजूर केला असून १३ कोटी वर्ग केले आहेत, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, भय, भ्रष्टाचार, प्रदूषण मुक्त शहर करण्यावर भर राहील. एक पक्ष दुसऱ्यावर आणि दुसरा पक्ष त्या पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप करत आहे. या दोघांमध्ये भ्रष्टाचाराबाबत स्पर्धा लागली आहे. या स्पर्धेत शिवसेनेला उतरायचे नाही. शहरातील भ्रष्टाचार दूर करायचा आहे. त्यासाठी शिवसेनेचे नगरसेवक निवडून द्यावेत. गुंठेवारी कायद्यानुसार नियमित झालेल्या घरांच्या मालकांना प्रॉपर्टी कार्ड देऊन हक्काचे घर त्यांच्या नावावर केले जाणार आहे. नगरविकास खाते एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. त्यांच्या माध्यमातून शहरातील सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील.

## संक्षिप्त




### येरवडा कारागृहात कैद्याला बेदम मारहाण

**पुणे, ता. १० :** येरवडा कारागृहात दोन कैद्यांनी एकाच्या डोक्यात फरशीचा तुकडा मारुन खून केल्याची घटना ताजी असतानाच आणखी एका कैद्याला बेदम मारहाण झाली आहे. गंभीर जखमी कैदी देवकरप्पा गराळे (वय ६५) याच्यावर ससूनमध्ये उपचार सुरू आहेत. याप्रकरणी फजिल अहमद अब्दुलकयुम अन्सारी याच्याविरुद्ध हवालदार प्रकाश भोसले यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.गराळे, अन्सारी दोघांनाही शिक्षा झाली असून कारागृहातील चांगल्या वर्तणुकीमुळे त्यांना खुल्या कारागृहात काम दिले आहे. तेथे बराक क्रमांक एक परिसरात वाद झाल्यावर अन्सारीने गराळे याच्या चेहऱ्यावर ठोसे मारले. यामुळे जखमी गराळे फरशीवर पडला.मारहाणीत गराळे यांच्या मेंदूत रक्तस्त्राव झाल्याने तो गंभीर जखमी झाला. पोलीस उपनिरीक्षक सी. बी. बेरड तपास करत आहेत.गेल्या महिन्यात न्यायालयीन कोठडीतील सराइताने एकाला फरशीच्या तुकड्याने मारहाण केली. यात गंभीर जखमी झालेल्या कैद्याचा ससूनमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. हाणामारीच्या घटना रोखण्यासाठी आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. नियंत्रण कक्षातून कैद्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवले जाते.

### नोकरी लावण्याच्या बहाण्याने अभियंत्याची २९ लाखांची फसवणूक

**पिंपरी, ता. १० :** एका अभियंता तरुणाला नामांकित कंपनीत नोकरी देण्याचे आमिष दाखवून तब्बल २९ लाख १६ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली. ही घटना ५ मे ते ६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान थेरगाव येथे घडली. या प्रकरणी २७ वर्षीय तरुणाने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी एका विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीला मोठ्या कंपनीत नोकरी देण्याचे प्रलोभन दिले. त्यानंतर सबस्क्रिप्शन चार्जेस, खाते उघडणे, एफ-६ फॉर्म, किट क्टिव्हेशन आणि सिक्युरिटी प्रोसेस अशा वेगवेगळ्या कारणांसाठी ऑनलाईन पैसे भरायला लावले. एकूण २९ लाख १६ हजार ४७२ रुपये भरून घेऊनही नोकरी न देता आरोपीने फसवणूक केली. वाकड पोलीस तपास करत आहेत.

### मोटीरीची दुचाकीला धडक, तरुण जखमी

**पिंपरी, ता. १० :** भरधाव वेगात येणाऱ्या एका मोटारीने दुचाकीला समोरासमोर धडक दिल्याने एक तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना गुरुवारी (ता. ०८) रात्री बाणेर येथे घडली. या प्रकरणात २५ वर्षीय तरुणाने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी मोटार चालकावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे बाणेर येथे कामावर जात असताना समोरून आलेल्या मोटार चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या दुचाकीचे नुकसान झाले असून ते जखमी झाले आहेत. हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.

### पिस्तूल बाळगल्या प्रकरणी तरुणास अटक

**सांगवी, ता. १० :** बेकायदेशीररीत्या देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. ही कारवाई गुरुवारी (ता. ८) रात्री जुनी सांगवी येथे करण्यात आली. या प्रकरणी पोलीस शिपाई आशिष बनकर यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. रवींद्र उर्फ रवी बापू ससाणे (२९, औंध, पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहर परिसरात शस्त्र बाळगण्यास मनाई असतानाही आरोपी ४७ हजार रुपये किमतीचे पिस्तूल आणि एक हजार रुपये किमतीचे जिवंत काडतूस घेऊन फिरत असताना मिळून आला. सांगवी पोलीस तपास करत आहेत.

### राज ठाकरेंचा लाडकी बहीण योजनेवर सरकारला थेट सवाल

**नाशिक, ता. १० :** नाशिक मधील सभेतून राज ठाकरे यांनी भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकेची तोफ डागली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवर भाष्य करत राज ठाकरे म्हणाले, सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण योजना आणली. या योजनंतर्गत प्रत्येक महिन्याला महिलांना १५०० रुपये दिले जात आहेत. पण महागाई किती वाढली आहे. १५०० रुपये फक्त १५ दिवसांत संपतात. घरगुती गॅस सिलेंडर आता १००० रुपयांना मिळतो. मग अशावेळी फक्त १५०० रुपये कसे टिकणार. तुमच्या पुढच्या पिढ्या नंतर म्हणतील, आमच्या भवितव्याचा विचार कोणी केला नाही. आमचं शहर तसंच राहिलं, त्याचा विकास झाल नाही. आमचा बाप विकला गेला, आईने पैसे घेतले, त्यामुळे आमचं भविष्य चांगलं घडलं नाही, अशी तुमची मुलं म्हणतील.

# महिला सरपंचांच्या नावावर पतींचा कारभार; सरपंच पती प्रथेविरोधात केंद्र सरकारचा कारवाईचा इशारा

**पुणे, ता. १० :** अनेक ग्राम पंचायतींमध्ये महिला सरपंच निवडून येत असल्या तरी प्रत्यक्ष कारभार त्यांच्या पतींकडून चालविला जात असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते. महिला सरपंच केवळ कागदोपत्री भूमिका बजावत असल्याने ही सरपंच पती प्रथा लोकशाहीस बाधक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने अशा प्रकाराविरोधात कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

सरपंच पतीसारख्या नेतृत्वाच्या पूर्ण निर्मूलनासाठी देशभरात कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करत केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव सुशीलकुमार लोहाणी यांनी महिला लोकप्रतिनिधींना स्वतंत्र निर्णय घेण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यावर भर दिला. ग्रामपंचायतींनी महिलांच्या प्रत्यक्ष सहभागासाठी सुरक्षित, सन्मानजनक आणि पोषक वातावरण निर्माण करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालय व राज्याच्या ग्रामीण विकास व पंचायत राज विभागाच्या संयुक्त विद्यमाने मॉडेल वूमन फ्रेंडली ग्रामपंचायत इनिशिएटीव्ह अंतर्गत आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी लोहाणी बोलत होते. यावेळी ग्रामीण विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे महासंचालक डॉ. निरंजन कुमार सुधांशू, संचालक विपुल उज्ज्वल, यूएनएफपीएच्या डॉ. दीपा प्रसाद यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महिला-स्नेही ग्रामपंचायत




घडविण्यासाठी केवळ आर्थिक संसाधने नव्हे, तर सामाजिक प्रबोधन आणि मानसिक परिवर्तन आवश्यक असल्याचे लोहाणी यांनी सांगितले. महिलांचे शिक्षण, कौशल्यविकास, आर्थिक स्वावलंबन, रोजगार संधी आणि प्रशासनातील सक्रिय सहभाग वाढविण्यावर ग्रामपंचायतींनी भर द्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

महिलांसाठी स्वच्छ व सुरक्षित शौचालये, घरपोच पाणीपुरवठा, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता व्यवस्था, आत्मविश्वास वृद्धीचे उपक्रम आणि महिला विकासासाठी आर्थिक सहाय्य या बाबींना प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले. इतर राज्यांतील यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून ते स्थानिक पातळीवर राबवावेत, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, संचालक विपुल उज्ज्वल यांनी महिला-स्नेही ग्रामपंचायत उपक्रमाची संकल्पना मांडली. शासन सहभाग, आरोग्य, शिक्षण, आर्थिक संधी, सुरक्षितता आदी घटकांवर आधारित ३५ सूचकांकांचा विशेष डॅशबोर्ड विकसित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

# जनाची नाही तर किमान मनाची तरी लाज बाळगायची

## बदलापूर प्रकरणी रोहित पवार यांची भाजपवर टीका

**बदलापूर, ता. १० :** येथील लैंगिक शोषण प्रकरणातील सहआरोपी तुषार आपटे यांना स्वीकृत नगरसेवक करण्यात आल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी महाराष्ट्र भाजपवर टीका केली आहे. एक्सवर पोस्ट करून रोहित पवार म्हणाले की, सहआरोपी असलेल्या व्यक्तीला थेट स्वीकृत नगरसेवक पद देताना भाजपला किमान जनाची नाही तर मनाची तरी लाज वाटायला हवी होती. नगरसेवक निवडून आणण्यास मदत केली म्हणून अशा लोकांना पदे देणे म्हणजे भाजप अजून किती खालच्या पातळीवर जाणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

रोहित पवार यांनी या निर्णयातून भाजप जनतेला नेमका कोणता



संदेश देऊ पाहत आहे, असा प्रश्न उपस्थित करत अशा प्रवृत्तीचा जाहीर निषेध केला आहे. याच पार्श्वभूमीवर, बलात्कारी नेत्याला वाचवण्यासाठीच अक्षय शिंदेचा एन्काउंटर नसून खून करण्यात आला, असे आता म्हणायचे का, अशी तीव्र प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. जनता हे सर्व विसरते, हेच या प्रकरणातील सर्वात मोठे दुर्दैव असल्याचेही त्यांनी ट्विटमध्ये नमूद केले आहे.

# ऑनलाइन गेमच्या आमिषाने तरुणाची ३७ लाखांची सायबर फसवणूक

**पुणे, ता. १० :** ऑनलाइन गेममधून मोठा आर्थिक लाभ मिळेल, असे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी वाघोलीतील एका तरुणाची ३६ लाख ७४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी वाघोली पोलिस ठाण्यात सायबर चोरट्यांविरुद्ध माहिती-तंत्रज्ञान कायदा व फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या प्रकरणी एका व्यावसायिकाने पोलिसांकडे तक्रार दिली आहे. तक्रारदार ३० वर्षीय तरुण असून तो वाघोली परिसरातील एका सोसायटीत वास्तव्यास आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी गेल्या वर्षी तरुणाच्या मोबाइलवर गुंतवणुकीबाबत संदेश पाठवून जास्त परताव्याचे आमिष दाखविले. त्यानंतर एका लिंकद्वारे त्याला ऑनलाइन गेम




च्या प्लॅटफॉर्मवर जोडण्यात आले.

ऑनलाइन गेम खेळल्यास मोठी कमाई होईल, असे भासवून चोरट्यांनी तरुणाला हळूहळू जाळ्यात ओढले. गेल्या आठ महिन्यांच्या कालावधीत तरुणाने ऑनलाइन गेमच्या नादात वेळोवेळी ३६ लाख ७४ हजार रुपये विविध बँक खात्यांत जमा केले. मात्र अपेक्षित परतावा न मिळाल्याने आणि फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने पोलिसांकडे धाव घेतली.या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे करत आहेत. दरम्यान, ऑनलाइन गेमच्या आमिषामुळे अनेक तरुण आर्थिक फसवणुकीचे बळी ठरत असल्याचे प्रकार सातत्याने समोर येत आहेत. शाळकरी मुलेही या गेमच्या आहारी जात असल्याचे निदर्शनास आले आहे. ऑनलाइन गेमशी संबंधित जाहिराती, संदेश किंवा संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात विश्व हिंदी दिवस साजरा

**लोणी काळभोर, ता. १० :** जगातील १५० हून अधिक देशात आज हिंदी भाषा बोलली जाते. जागतिकीकरणाच्या युगात हिंदी भाषा देखील अधिकाधिक ग्लोबल होताना दिसते. प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी कमीत कमी हिंदी भाषेतच विचारांची देवाण-घेवाण केले पाहिजे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी केले आहे.

लोणी काळभोर (ता. हवेली) समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात विश्व हिंदी दिवस शनिवारी (ता.१०) साजरा करण्यात आला. हिंदी दिना निमित्त विद्यालयात भितीपत्रिकेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वरील प्रतिपादन प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी केले आहे.

यावेळी बोलताना हिंदी विभाग



प्रमुख प्रा. डॉ. संभाजी निकम म्हणाले की, १० जानेवारी १९७५ साली पहिले विश्व हिंदी संमेलन झाले. १० जानेवारी २००६ साली माजी पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी हा दिवस विश्व हिंदी दिवस म्हणून साजरा करण्यात यावा अशी घोषणा केली. तेव्हापासून हा दिवस विश्व हिंदी दिवस म्हणून ओळखला जातो आणि सर्वत्र साजरा केला जातो.

दरम्यान, हिंदी दिनाचे औचित्य साधून हिंदी साहित्याचे प्रसिद्ध नाट्य लेखक मोहन राकेश यांचा जन्म दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या सूत्रसंचालन प्रा. स्नेहा हिंगमिरे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व हिंदी विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# देवेंद्र फडणवीस अन् एकनाथ शिंदेंना घोटाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न

**मुंबई, ता. १० :** महापालिका निवडणुकीच्या काळात राजकीय नेत्यांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना राज्याच्या गृहविभागातून माजी पोलीस महासंचालकांवर गंभीर आरोप करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना २०२१ मध्ये अर्बन लँड सीलिंग (यूएलसी) घोटाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न केल्याचा त्यांच्यावर आरोप केला आहे. राज्याच्या गृह विभागाच्या एका विशेष चौकशी अहवालातून हा आरोप समोर आला. हा अहवाल नुकत्याच निवृत्त झालेल्या माजी पोलीस महासंचालक (डीजीपी) रश्मी शुक्ला यांनी त्यांच्या निवृत्तीच्या अवघ्या चार दिवस आधी सादर केला होता.

माजी पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी ठाण्याचे तत्कालीन डीसीपी लक्ष्मीकांत पाटील आणि एसीपी सरदार



पाटील यांना २०१६ च्या यूएलसी घोटाळा प्रकरणात देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना अटक करण्याचे निर्देश दिले होते. अहवालात असा दावा करण्यात आला आहे की, पांडे यांचा उद्देश हा दर्शवण्याचा होता की या दोन्ही नेत्यांनी बिल्डरांकडून पैशांची वसुली केली होती. यासाठी, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांवर सतत दबाव आणला गेला. विशेष चौकशी अहवालात या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या संजय पुनामिया यांनी सादर केलेल्या एका ऑडिओ क्लिपचा देखील उल्लेख आहे. या रेकॉर्डिंगमध्ये कथितरित्या एसीपी सरदार पाटील, डीजीपी संजय पांडे आणि डीसीपी लक्ष्मीकांत पाटील यांच्यात झालेली बातचीत नोंदवण्यात आली आहे, ज्यात फडणवीस यांना गोवण्याच्या रणनीतीवर चर्चा करण्यात आली होती.

दरम्यान, अहवालात म्हटले आहे की, जेव्हा संजय पुनामिया आणि सुनील जैन यांना कोपरी पोलिस स्टेशनमध्ये अटक करण्यात आले, तेव्हा ठाण्याचे तत्कालीन डीसीपी (गुन्हे) लक्ष्मीकांत पाटील यांनी यूएलसी घोटाळ्यासंबंधी त्यांची चौकशी केली. वास्तविक पाहता ते या चौकशीशी थेट जोडलेले नव्हते.

# कदमवाकवस्ती येथून १३ वर्षाच्या मुलीचे अपहरण; पोलिसांकडून ८ तासांच्या आत मुलीची सुटका

**लोणी काळभोर, ता. १० :** तेरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता.हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील एका इमारतीच्या परिसरात घडली असून शुक्रवारी (ता.९) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. लोणी काळभोर पोलिसांनी अतिशय कौशल्यरीत्या तपास करून अवघ्या ८ तासांच्याआत गुन्ह्याचा छडा लावला आहे. अल्पवयीन मुलीला धाराशिव येथून आणून पालकांकडे सुखरूप सुपूर्त केले असून आरोपीला अटक केले आहे. लोणी काळभोर पोलिसांच्या या प्रशंसनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या




माहितीनुसार, अल्पवयीन मुलगी ही तिच्या आजीकडे राहत होती. तिची आजी ही एका सोसायटीमध्ये साफसफाई करीत आहे. आजी या नेहमीप्रमाणे शुक्रवारी सोसायटीत काम करत होत्या. त्यावेळी त्यांच्यासोबत अल्पवयीन नात देखील होती. आजी सोसायटीतील सेक्युरिटीच्या केबिनची साफसफाई करीत असताना तिची नात पिडीत मुलगी ही केबिनच्या बाहेर थांबलेली होती.

केबिनमधील काम संपवुन आजी बाहेर आली त्यावेळी त्यांना तेथे नात दिसली नाही. त्यानंतर त्यांनी अल्पवयीन तिचा शोध घेतला. परंतु, ती कोठेही मिळून आली नाही. तसेच नातेवाईकांकडेदेखील चौकशी केली परंतु, आढळून आली नाही. त्यामुळे आजीने शुक्रवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात आरोपीच्याविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव बोबडे व त्यांच्या सहकाऱ्यांचे एक पथक तयार केले. सदराचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माहिती घेतली असता, पिडीत मुलगी ही धाराशिव येथे असल्याचे लोकेशन मिळाले. पथकाने थोडा ही वेळ न दवडता तात्काळ अवघ्या ८ तासांत २५० किलोमीटर सलग प्रवास केला. त्यानंतर धाराशिव शहरातून मुलीला ताब्यात घेतले आहे. तर अपहरणकर्त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

दरम्यान, थेऊर कोलवडी नदी ब्रिजवरुन उडी मारुन आत्महत्या करणाऱ्या महीलेचा जीव लोणी काळभोर पोलिसांनी शुक्रवारी (ता.९) वाचविला आहे. त्यातच आता १३ वर्षीय पिडीत मुलीचा सुमारे २५० किलोमीटर अंतर प्रवास करुन अवघ्या ८ तासांच्या आत आरोपीला अटक केली आहे. तसेच अल्पवयीन मुलीला सुखरूप तिच्या पालकांच्या स्वाधीन केले आहे. लोणी काळभोर पोलिसांच्या या दोन्ही धडाकेबाज कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी पुणे शहर पोलीस उपआयुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव बोबडे, पोलीस हवालदार रामहरी वणवे, पोलीस अंमलदार किशोर कुलकर्णी, महिला पोलीस हवालदार वैशाली निकंबे यांच्या पथकाने केली आहे.

# दहावी बारावी परीक्षांसाठी सीसीटीव्ही आणि ड्रोनद्वारे कडक देखरेख व्यवस्था लागू



**पुणे, ता. १० :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा निकोप, गुणवत्तापूर्ण वातावरणात होण्यासाठी आता राज्यस्तरीय दक्षता समिती नियुक्त करण्यात आली आहे. या परीक्षांवेळी कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबवण्याबरोबरच तणावमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्याची जबाबदारी राज्यस्तरीय दक्षता समितीवर सोपवण्यात आली असून, परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्हीचे नियंत्रण जिल्हा प्रशासनाकडे असेल.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासननिर्णय प्रसिद्ध केला. दहावी, बारावीच्या परीक्षा निकोप, गुणवत्तापूर्ण वातावरणात होण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. त्यानुसार प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती स्थापन करण्यात आलेली आहे. दक्षता समितीच्या सदस्यांनी परीक्षा कालावधीत केंद्रांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक आहे.

विभागीय परीक्षा मंडळांनी उपद्रवी आणि संवेदनशील केंद्र ठरविलेल्या परीक्षा केंद्रांवर प्रभावी यंत्रणेची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. जिल्हास्तरावर दक्षता समिती कार्यरत असली, तरी राज्यस्तरावर समन्वय, नियंत्रण व प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र राज्यस्तरीय दक्षता समितीची गरज लक्षात घेऊन राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

दरम्यान, शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय दक्षता समितीमध्ये राज्य मंडळाचे अध्यक्ष, सर्व परिक्षेत्रांचे विशेष पोलीस महानिरीक्षक, अतिरिक्त आयुक्त, विभागीय आयुक्त सदस्य कार्यालय, प्राथमिक शिक्षण संचालक, माध्यमिक शिक्षण संचालक, शिक्षण योजना संचालक, राज्य मंडळ सचिव यांचा समावेश आहे. दहावी, बारावीच्या परीक्षा शांततेत आणि तणावमुक्त वातावरणात पार पडण्यासाठीचे वातावरण तयार करणे, राज्यभर कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबवणे ही जबाबदारी राज्यस्तरीय समितीवर असल्याचे स्पष्ट केले आहे.

# अमोल बालवडकर यांचा घायवळ सोबतचा व्हिडीओ व्हायरल

**पुणे, ता. १० :** पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचार अंतिम टप्प्यात आला असून एकीकडे शहरात थंडीचा कडाका वाढत असताना दुसरीकडे राजकीय वातावरण मात्र चांगलेच तापले आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना प्रभाग क्रमांक ९ मधील लढत विशेष लक्षवेधी ठरत आहे. भाजपचे उमेदवार लहू बालवडकर आणि भाजपकडून तिकीट नाकारल्यानंतर राष्ट्रवादीत जाऊन निवडणूक लढवत असलेले अमोल बालवडकर यांच्यातील संघर्ष आता टोकाला पोहोचला आहे.



लहू बालवडकर यांनी सोशल मीडियावरील एक्स प्लॅटफॉर्मवर अमोल बालवडकर यांचे कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्यासोबतचे काही व्हिडिओ शेअर केले आहेत. या व्हिडिओंमध्ये अमोल बालवडकर आणि निलेश घायवळ मद्य पार्टी करताना दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. हे व्हिडिओ समोर आल्यानंतर बाणेर-बालेवाडी परिसरात मोठी खळबळ उडाली असून राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

हे व्हिडिओ शेअर करत लहू बालवडकर यांनी अमोल बालवडकर यांच्यावर जोरदार टीका केली आहे. पुण्याची ओळख ही शांतता, विचारशीलता आणि जबाबदार वर्तनाची असून सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी ही मूल्ये जपली पाहिजेत, असे त्यांनी म्हटले आहे. संस्कृती ही भाषणातून नव्हे तर कृतीतून दिसते, आणि सुशिक्षित परिसरातील नागरिकांना गोंधळापेक्षा विकासकेंद्रित नेतृत्व हवे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान या प्रकरणावर अमोल बालवडकर यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. माझ्याविरोधात निमेटेड व्हिडिओ बनवण्याचे काम सुरू असून या व्हिडिओंबाबत मी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे, असे त्यांनी सांगितले. या व्हिडिओची सत्यता तपासली जावी अशी मागणी करत २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत इथल्याच नेत्यांनी निलेश घायवळची मदत घेतली होती, असा आरोपही त्यांनी केला आहे.

तिकीट नाकारल्यानंतर अमोल बालवडकर यांनी भाजप नेतृत्वावर सातत्याने टीका सुरू ठेवली असून या नव्या आरोपांमुळे पुण्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या तोंडावर हा वाद चांगलाच रंगताना दिसत आहे.

# गिरिजा ओक घेणार फडणवीसांची मुलाखत

**पुणे, ता. १० :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा वेग वाढत असताना बड्या राजकीय नेत्यांच्या मुलाखतींमुळे निवडणुकीला नवा रंग चढताना दिसत आहे. अनेक नेत्यांच्या मुलाखती सध्या चर्चेत असून काही दिवसांपूर्वी ठाणे महापालिकेच्या पार्श्वभूमीवर वीण दोघातली तुटेना या लोकप्रिय मालिकेतील अभिनेत्री तेजश्री प्रधानने आपलं ठाणे आपले देवाभाऊ या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली होती. या मुलाखतीत तेजश्री प्रधानने मुंबईकर म्हणून काही प्रश्न आणि समस्या मांडल्याचेही पाहायला मिळाले होते.



आता देशभरातील तरुणाईची क्रश म्हणून ओळखली जाणारी प्रसिद्ध अभिनेत्री गिरिजा ओक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेणार आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने पुणे शहरात संवाद पुणेकरांशी नावाचा विशेष संवादात्मक कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस थेट नागरिकांशी संवाद साधणार असून त्यांची मुलाखत अभिनेत्री गिरिजा ओक घेणार आहे.

हा कार्यक्रम रविवारी ११ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता एरंडवणे येथील शुभारंभ लॉन्स येथे होणार आहे. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

प्रचारात लोकप्रिय चेहऱ्यांचा वापर करणे हे राजकारणातील जुनेच गणित आहे. एखाद्या लोकप्रिय अभिनेत्रीचा चेहरा समोर आला की लोकांचे लक्ष आपोआप वेधले जाते. हेच गणित भारतीय जनता पक्षाने अचूक हेरले असल्याची चर्चा सध्या रंगली आहे. गेल्या काही दिवसांत अनेक मराठी कलाकारांनी भाजपला जाहीर समर्थन दिल्याचे दिसून आले आहे. अभिनेता आणि निर्माते महेश कोठारे तसेच अभिनेत्री निवेदिता सराफ यांनीही भाजपविषयी आपली भूमिका उघडपणे मांडली होती.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचा हा सेलिब्रिटी पॅटर्न आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुलाखतींमधूनही दिसून येत आहे. ठाण्यात अभिनेत्री तेजश्री प्रधान आणि पुण्यात अभिनेत्री गिरिजा ओक हे चेहरे मुलाखतकार म्हणून दिसणार असल्याने या कार्यक्रमांची चांगलीच चर्चा सुरू झाली आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणात तहलियानी समितीचा अहवाल सादर

## दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होणार?

**बीड, ता. १० :** बीडजिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटीसोबतच निवृत्त न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली होती. या समितीने २४ नोव्हेंबर २०२५ रोजी आपला चौकशी अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे.



या अहवालात घटनेत जबाबदार असलेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा तपशील नमूद करण्यात आला असून भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आपत्कालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. या चौकशी समितीने काढलेल्या निष्कर्षांची छाननी करून त्यावर पुढील कार्यवाहीसाठी सरकारकडे मसुदा सादर करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. या नव्या समितीमध्ये गृह विभागाचे प्रधान सचिव, अतिरिक्त पोलीस महासंचालक कायदा व सुव्यवस्था, गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट, गृह विभागाचे उपसचिव विधी यांचा समावेश आहे. गृह विभागाचे उपसचिव हे या समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

दरम्यान संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी बीड येथील मकोका न्यायालयात सुरू असून मागील सुनावणीवेळी दोषारोप निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे आता या प्रकरणाच्या सुनावणीला गती मिळण्याची शक्यता आहे. या संपूर्ण प्रकरणाकडे राज्याचे लक्ष लागले असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी देशमुख कुटुंबीयांसह ग्रामस्थांकडून केली जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## चेहऱ्यावर फळांचा पल्प लावण्याचे फायदे, जाणून घ्या

**पुणे, ता. १० :** आपण घरी असलेल्या फळांचा योग्य वापर केला तर, आपल्याही सौंदर्यात चांगलीच भर पडेल. फळे आरोग्यासाठी किती फायदेशीर असतात हे आपण सर्वच जाणतो, पण तुम्ही कधी विचार केला आहे का की ही फळे त्वचेचे सौंदर्य वाढवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. आपण घरी असलेल्या कोणत्या फळांपासून फ्रूट फेशियल करु शकतो हे जाणून घेऊया.

सर्वप्रथम आपण फ्रुट फेशियल म्हणजे काय हे जाणून घेऊ. फळांमध्ये असलेले अनेक घटक हे त्वचेसाठी खूपच आवश्यक असतात. फेशियल करताना त्वचेवर होणारा मसाज यामधून फळांचे गुण हे आपल्या त्वचेसाठी पोषक ठरतात.

केळी त्वचेसाठी केळी हे एक नैसर्गिक चमक देण्यासाठी उत्तम उपाय मानला जातो. केळ्यामध्ये त्वचा एक्सफोलिएट करण्याचे गुणधर्म आहेत, त्यामुळे त्वचेच्या मृत पेशींना एक्सफोलिएट करण्यात मदत होते. तसेच फेसपॅक म्हणून केळीचा वापर केल्यास टॅनिंगची समस्या कमी होऊ शकते. एवढेच नाही तर, केळ्यामध्ये मुरुमविरोधी आणि वृद्धत्वविरोधी गुणधर्म देखील समृद्ध असतात, ज्यामुळे मुरुम आणि सुरकुत्याची समस्या कमी होते.

संत्री संत्रे खाण्यासोबतच त्वचेसाठी खूप फायदेशीर मानली जातात. संत्र्यामध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्म असतात, त्यामुळे संत्र्याचा वापर हा नैसर्गिक ब्लीच म्हणून काम करतो. संत्रे त्वचेवर लावल्यास झटपट चमक येण्यास मदत होते. तसेच, मुरुमांची समस्या आणि वृद्धत्वाचे परिणाम कमी करण्यासाठी हे उपयुक्त मानले जाते.

पपई पपई त्वचेसाठी देखील फायदेशीर मानली जाते. वास्तविक, हे एक उत्तम ब्लीचिंग एजंट म्हणून काम करू शकते, जे मृत पेशी काढून नवीन आणि निरोगी पेशी तयार करण्यात मदत करू शकते. या प्रक्रियेमुळे त्वचेच्या रंगात बरीच सुधारणा दिसून येते.

# निवडणुकीत शिवसेना ठरणार किंगमेकर? एकनाथ शिंदेंनी भरसभेत केला मोठा दावा

**पुणे, ता. १० :** शिवसेना स्वबळावर लढत आहे, म्हणून कुणीही हलक्यात घेऊ नका. विधानसभेला परिवर्तन घडवले, तेच परिवर्तन आता लाडक्या बहिणी महापालिकेतही घडवतील आणि विरोधकांना कात्रजचा घाट दाखवतील, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनी पुण्यात व्यक्त केला. पुणे गुन्हेगारीमुक्त, गुंडगिरीमुक्त, भ्रष्टाचारमुक्त होण्यासाठी महापालिकेत शिवसेनेचा भगवा फडकवा, असे आवाहन शिंदे यांनी पुणेकरांना केले.



पुणे शहरातील कात्रज आणि नाना पेठेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहीर सभा झाल्या. या वेळी शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे, उद्योगमंत्री उदय सामंत, माजी आमदार तानाजी सावंत, माजी आमदार व महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर, शहरप्रमुख प्रमोद भानगिरे, जिल्हा प्रमुख रमेश कोंडे, अजय भोसले, युवासेना प्रदेश सचिव किरण साळी, आबा बागुल, नमेश बाबर यासह उमेदवार उपस्थित होते.

यावेळी शिवसेना पक्षाचा शब्द शिवसेनेचा या वाचनानाम्याचे प्रकाशन करण्यात आले. महापालिका निवडणुकीची लढाई धनशक्ती विरुद्ध शिवशक्तीची असून, असा परिस्थितीत शिवसैनिकाला वाऱ्यावर सोडणारी ही शिवसेना नाही. मी जेथे-जेथे सभेला जातो तेथे लाडक्या बहिणी आवर्जून मोठ्या प्रमाणात उपस्थित असतात. येत्या १५ तारखेला मतदान नव्हे, तर तुमच्या मुलाबाळांच्या भविष्याचा निर्णय घेणारी निवडणूक आहे.

मी मुख्यमंत्री असताना कल्याणकारी योजना राबवल्या. त्यामध्ये लाडकी बहीण योजना, महिलांना राज्य परिवहन बसमध्ये ५० टक्केसूट, मुलींना मोफत शिक्षण युवकांना रोजगार आदी आहेत. या वेळी शिवसेना स्वबळावर लढत असून, आपला अजेंडा हा पुण्याचा विकास व लोकांचे जीवनमान सुधारणे हा आहे. माझ्याकडे गृहनिर्माण विभाग आहे. शहरातील वाड्यांचा विकास, म्हाडातून सर्वसामान्यांना घरे द्यायची आहेत.

शिवसेना किंगमेकर ठरेल शिवसेनेचे शहरप्रमुख नाना भानगिरे यांच्या गाडीवर झालेल्या हल्ल्याबाबत शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. गाडीवर भ्याड हल्ला करून पळून जाऊ नका. हिंमत असेल, तर समोर येऊन लढाई करा. कोविड, महापूर, आपत्तीत लोकांना मदत करतात. मी आधी अनेक ऑपरेशन केले आहेत. कोणाची सर्जरी करायची व कोणाला गोळी द्यायची, हे चांगले माहिती आहे.

शिवसेना महापालिका निवडणुकीत किंगमेकर ठरेल, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या वेळी डॉ. गोऱ्हे यांनी शिवसेनेचा जाहीरनाम्याचे वाचन केले, तर सामंत यांनी वाहतुकीचा प्रश्न सोडविण्याचे आवाहन केले. महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांनी पुण्यातून गुन्हेगारी, पब संस्कृती बंद झाली पाहिजे, असे सांगितले.

## इंस्टाग्रामवरील मित्राकडून तरुणीची एक लाखाची फसवणूक

**पिंपरी, ता. १० :** सोशल मिडीयातील इंस्टाग्रामवर झालेल्या मैत्रीतून एका तरुणीचा विश्वास संपादन करून तिला मोबाईलमध्ये संशयास्पद लिंक डाऊनलोड करायला सांगत मित्राने बँक खात्यातून पैसे काढून घेतले. ही घटना १३ आणि १४ डिसेंबर २०२५ दरम्यान चऱ्होली बुद्रुक येथे घडली. या प्रकरणात एका महिलेने दिघी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी तन्मय अमोल पांडे (१९, यवतमाळ, सध्या हिंजवडी) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तन्मय याने फिर्यादीच्या भाचीशी इंस्टाग्रामवर ओळख वाढवून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने तिला एक ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यासाठी लिंक पाठवली. फिर्यादीने ते ॲप डाऊनलोड करताच आरोपीने त्यांच्या मोबाईलचा ताबा मिळवला आणि खात्यातून ९२ हजार ७९४ रुपये काढून घेतले. दिघी पोलीस तपास करत आहेत.

# सात दाखले आपले सरकारवर मिळणार

**नाशिक, ता. १० :** ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेत मिळाव्यात या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत ग्रामविकास विभागाच्या एकूण ७ महत्त्वाच्या सेवा आता शासनाच्या अधिकृत आपले सरकार या ऑनलाइन पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सुविधांचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी केले आहे.

डिजिटल महाराष्ट्र या संकल्पनेनुसार नागरिक-केंद्रित सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद सातत्याने पावले उचलत आहे. यापूर्वी विविध दाखले आणि प्रमाणपत्रांसाठी ग्रामीण नागरिकांना ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत होत्या. कागदपत्रांची पूर्तता, अर्जाची चौकशी आणि मंजुरीसाठी लागणारा वेळ यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा मोठ्या प्रमाणात खर्च होत होता. मात्र आता आपले सरकार पोर्टलवरील या नव्या डिजिटल सेवांमुळे ही अडचण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.


या पोर्टलच्या माध्यमातून नागरिक घरबसल्या ऑनलाइन अर्ज सादर करू शकणार आहेत. अर्ज केल्यानंतर त्याची सद्यस्थिती, प्रक्रियेतील टप्पे आणि मंजुरीची माहिती ऑनलाइनच पाहता येणार आहे. त्यामुळे अर्जदाराला कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची गरज कमी होणार असून सेवा प्रक्रियेत पारदर्शकता वाढणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी सांगितले की, आपले सरकार पोर्टलवरील सेवा नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. डिजिटल माध्यमांचा स्वीकार केल्यास शासकीय कामकाज अधिक वेगवान होईल आणि नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास वाढेल.

सध्या या पोर्टलवर जन्म नोंद दाखला, मृत्यू नोंद दाखला, विवाह नोंद दाखला, दारिद्र्य रेषेखालील दाखला, ग्रामपंचायतीकडून येणे बाकी नसल्याचा दाखला, नमुना क्रमांक ८ चा उतारा तसेच निराधार असल्याचा दाखला या ७ सेवा उपलब्ध आहेत. या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचणार असून शासकीय सेवा अधिक जलद आणि प्रभावीपणे मिळणार आहेत.

## भाजपची अवस्था पिंजरा चित्रपटातील मास्तरासारखी : जयंत पाटील

**मुंबई, ता. १० :** भाजपची अवस्था ही पिंजरा नावाच्या चित्रपटातील मास्तरासारखी झाली आहे. मास्तर तमाशा बंद करायला आले होते, पण मास्तराला तमाशाचा इतका नाद लागला की, तोच तुणतुणे घेऊन पुढे उभा राहिला, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून केंद्र व राज्यातील सत्ताधारी भाजपवर जोरदार हल्ला चढवला.



भाजपचे ज्येष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी भाजपला सर्वाधिक जागा असूनही वेगवेगळ्या आघाड्या एकत्र करून सत्ता बनवण्याचे नाकारले होते. मात्र आज भाजप काय करतेय? सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेसमधील नेत्यांना फोडून पक्षात घेत आहे. काँग्रेसमुक्त भारतचा नारा देणारा भाजप आज स्वतःच काँग्रेसयुक्त झाला आहे, अशा शब्दात जयंत पाटील यांनी भाजपच्या पह्डापह्डीच्या राजकारणावर निशाणा साधला.

भाजप स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेते. मात्र अकोल्यात त्यांनी ज्या एमआयएम आणि ओवेसींवर नेहमी टीका केली, त्यांच्याशीच हातमिळवणी केली आहे. सत्तेसाठी कोणाच्याही मांडीला मांडी लावून बसायला यांना काही वाटत नाही. यांचे दाखवायचे दात आणि खायचे दात वेगळे आहेत, हे आता जनतेने ओळखावे, असे जयंत पाटील म्हणाले.



## भाजपाने परवानगी दिली तर एकनाथ शिंदेंचा टांगा पलटी करेन

**नवी मुंबई, ता. ९ :** राज्यात भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) युतीचे सरकार सत्तेवर असले तरी नवी मुंबई महापालिकेत मात्र हे दोन्ही पक्ष स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. या निवडणुकीत गणेश नाईक विरुद्ध शिंदेची शिवसेना असा सामना रंगला असतानाच, गणेश नाईक यांनी पुन्हा शिंदेवर टिका केली आहे. भाजपाने परवानगी दिली तर एकनाथ शिंदेंचा टांगा पलटी करून घोडेपण बेपत्ता करेन, असे खुले आव्हान गणेश नाईक यांनी शिंदे यांना दिले आहे.

नवी मुंबईत शिवसेना (शिंदे गट) विरुद्ध भाजप असा सामना रंगला आहे. वनमंत्री गणेश नाईक आणि शिंदे सेनेचे नेते यांच्यात गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोप तसेच टिकाटिप्पणी सुरू आहे. नवी मुंबई महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने शहरात सुरू केलेल्या नवी मुंबई, नवं सरकार या प्रचाराला नवी मुंबईकरांसाठी जुनं तेच सोनं असल्याचे जोरदार प्रत्युत्तर भाजप नेते आणि वनमंत्री गणेश नाईक यांनी लोकसत्ता लोकसंवाद या कार्यक्रमात दिले.ठाणे हा कोणाचाही बालेकिल्ला नाही. केंद्रीय नेतृत्वाने रोखले नसते आणि माझ्याकडे जबाबदारी दिली असती तर संपूर्ण जिल्ह्याचे राजकीय चित्र पालटून दाखविले असते, असा दावाही नाईक यांनी यावेळी केला होता. गेल्या पाच वर्षांत प्रशासकीय कालावधीत नवी मुंबईला लुटणाऱ्यांना येथील मतदार घरचा रस्ता दाखवतील, असेही नाईक यावेळी म्हणाले होते.

गणेश नाईक यांनी केलेल्या विधानामुळे शिंदेच्या सेनेत अस्वस्थता पसरली असतानाच, गणेश नाईक यांनी आता पुन्हा शिंदेवर टिका केली आहे. एकनाथ शिंदे यांच्याशी माझे काहीही वैयक्तिक मतभेद नाही. पण एकनाथ शिंदे नेहमी म्हणातात, मला हलक्यात घेऊन नका, टांगा पलटी घोडे फरार करेन पण तुम्ही गणेश नाईकांना हलक्यात घेतले ना तुमच्या आधी मी येथे तीन वेळा ठाणे जिल्ह्याचा पालकमंत्री होतो.

## चार कारवायांमध्ये साडेतीन लाखांचा मद्यसाठा जप्त

**चाकण, ता. १० :** म्हाळुंगे, शिरगाव आणि चाकण परिसरात केलेल्या चार कारवायांमध्ये पोलिसांनी साडेतीन लाख रुपयांचा मद्यसाठा आणि मद्य तयार करण्यासाठी वापरलेले रसायन नष्ट केले आहे. गोणवडीत भाम नदीच्या काठी गावठी मद्य तयार करण्यासाठी नदीपात्राजवळ भिजत घातलेले ३० हजार रुपये किमतीचे ६०० लिटर रसायन गुन्हे शाखेच्या पथकाने नष्ट केले आहे. ही कारवाई बुधवारी (ता. ०७) रोजी दुपारी गोणवडी गावाच्या स्मशान भूमीजवळ करण्यात आली. या प्रकरणी पोलीस शिपाई सुधीर शिवाजी दांगट यांनी म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



शिरगावमध्ये पवना नदीकाठी हातभट्टीचे मद्य तयार करण्याच्या उद्देशाने भिजत घातलेले ५ हजार लिटर गुळमिश्रित रसायन पोलिसांनी कारवाई करत नष्ट केले आहे. ही कारवाई गुरुवारी (ता. ०८) करण्यात आली. या प्रकरणी पोलीस शिपाई दिलीप विश्वनाथ राठोड यांनी शिरगाव परंदवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. एका महिलेवर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चाकण परिसरात एक शेतामध्ये बेकायदेशीररीत्या गावठी मद्य तयार करण्यासाठी साठवलेले एक लाख रुपये किमतीचे २ हजार लिटर कच्चे रसायन पोलिसांनी छापा टाकून नष्ट केले आहे.

ही कारवाई साबळेवाडी गावच्या हद्दीत करण्यात आली. या प्रकरणी पोलीस शिपाई प्रदीप राळे यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पुसाने गावात अवैध मद्य निर्मितीसाठी साठवलेले ५६ हजार रुपये किमतीचे १ हजार ६०० लिटर गुळमिश्रित रसायन पोलिसांनी जप्त केले आहे. ही कारवाई गुरुवारी दुपारी करण्यात आली. या प्रकरणी पोलीस शिपाई प्रदीप गोडाबे यांनी शिरगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. एका महिलेवर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवारांची अशोक चव्हाणांवर तीव्र शब्दांत टीका

**चंद्रपूर, ता. १० :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चंद्रपुरात राजकीय वातावरण तापले असून काँग्रेसच्या प्रचाराची धुरा सांभाळणारे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजप खासदार अशोक चव्हाण यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. चंद्रपुरातील छोटा बाजार परिसरात झालेल्या सभेत वडेट्टीवार यांनी अशोक चव्हाण यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला.



कुणाचेही मटण खा आणि कमळाचे बटण दाबा, असे वक्तव्य अशोक चव्हाण यांनी केले होते. यावर प्रतिक्रिया देताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, अशोक चव्हाण यांनी आयुष्यभर काँग्रेसचे मटण खाल्ले आणि आता जनतेला कमळाचे बटण दाबायला सांगत आहेत. हे दुटप्पी राजकारण जनतेच्या लक्षात येत असल्याची टीकाही त्यांनी केली.

याच सभेत विजय वडेट्टीवार यांनी १४ तारखेला नोटांचा वर्षाव होणार असल्याचा टोला लगावला. त्या दिवशी ढग दाटून येतील आणि जोरदार पाऊस पडेल. मात्र हा पाऊस पाण्याचा नसून नोटांचा असेल. या नोटा घ्यायच्या की नाही हे जनतेने ठरवावे, असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे भाजपवर आरोप केला.

दरम्यान अशोक चव्हाण यांनी यापूर्वी रोज मटण खा आणि भाजपचे बटण दाबा असे वक्तव्य केले होते. एकाचं मटण खाऊन दुसऱ्याला मतदान करू नका, मी काही मटण देणार नाही असेही त्यांनी सांगितले होते. यावेळी त्यांनी शिवसेनेवरही टीका केली होती. शिवसेनेचे काही आमदार अधिकृत उमेदवाराचा प्रचार करत नाहीत, अशी टीका करत नांदेडचा खेळ खंडोबा झाल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला होता.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सर्वच पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू असून नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना दिसत आहेत. त्यामुळे निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

## काँग्रेसला सत्ता देऊ, पण भाजपची जिरवू

### महादेव जानकरांची कडाडून टीका

**सोलापूर, ता. १० :** महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे. राजकीय आरोप आणि प्रत्यारोपांनी राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे (रासप) अध्यक्ष महादेव जानकर यांनी सोलापुरात प्रचारादरम्यान भाजपवर जोरदार टीका केली. आम्ही भाजपचे बाप आहोत. कारण आम्हीच त्यांना सत्तेत आणले होते. वेळ आली तर आम्ही काँग्रेसला सत्ता देऊ, पण भाजपची जिरवू, अशी टीका करत जानकर यांनी भाजपला आव्हान दिले आहे.

भाजपवर टीका करताना जानकर म्हणाले की, भाजप स्वतःला 'पार्टी विथ डिफरन्स' म्हणवते, मात्र आता त्या पक्षात कोणताही फरक राहिलेला नाही. भाजपमधील जुन्या कार्यकर्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. जर आमदारांचीच अवस्था इतकी वाईट असेल तर



सामान्य कार्यकर्त्यांची अवस्था काय असेल? सध्याच्या भाजप कार्यकर्त्यांकडे कोणतीही विचारधारा नसून फक्त सत्ता कशी टिकवायची, पैसा कसा कमवायचा याचाच विचार केला जातो, असा आरोप जानकर यांनी केला.

सत्ता काँग्रेसमधून आलेल्यांकडे, मूळ कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्या उचलायच्या का, भाजपमध्ये आज ओरिजनल कार्यकर्त्यांना स्थान नाही. काँग्रेसमधून आलेले लोक सत्तेचा उपभोग घेत आहेत. काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपमध्ये आले आहेत. त्यामुळे मूळ भाजप कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्या उचलण्याचे काम करायचे, असा टोला त्यांनी लगावला.

# उपमुख्यमंत्री अजित दादांना कशाला चॅलेंज करता, मीच येतो समोर

## नीलेश घायवळच्या पासपोर्ट प्रकरणावरून रोहित पवारांचं मोहोळांना ओपन चॅलेंज

**पुणे, ता. १० :** महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा पराभव झाला तर त्याचे खापर आपल्यावर फुटेल, या भीतीने केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ घाबरले आहेत, अशी जोरदार टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे पुणे निवडणूक प्रभारी आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी केली. गुंड नीलेश घायवळ याला पारपत्र देण्याच्या विषयावरून मोहोळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना चॅलेंज दिले आहे. मात्र दादांना कशाला चॅलेंज करता, गुंडाच्या पारपत्राबाबत मीच तुमच्याशी बोलायला तयार आहे, अशी टिप्पणीही रोहित पवार यांनी केली.



राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी वारजे परिसरात आले असताना रोहित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधताना मोहोळ यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले की, कोणताही प्रकल्प सुरू करण्यापूर्वी त्यासाठी परवानगी घ्यावी लागते. याबाबत अजित पवार आपली भूमिका मांडत होते. मात्र भाजपकडून शहरात सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांना आणि विविध व्यवसायांना अडचणी निर्माण केल्या जात आहेत. ठेकेदार आणि व्यावसायिकांना धमक्या दिल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

भाजपमुळे पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराची अक्षरशः वाताहत झाली आहे. शहराचा ज्या पद्धतीने विकास व्हायला हवा होता, तसा विकास सत्ताधाऱ्यांनी केला नाही. आमदार महेश लांडगे भाषणात बांगड्या भरल्या नाहीत असे वक्तव्य करतात, यातून महिलांचा अपमान होत असल्याचे स्पष्ट दिसते. आमदार लांडगे यांचा खरा चेहरा आता जनतेसमोर येऊ लागला असून त्यामुळेच तेही घाबरले असल्याची टीका रोहित पवार यांनी केली.

मोहोळ यांचा दिल्लीतील संपर्क वाढला आहे. त्यांच्या या संपर्कातून नेमका कोणी त्यांचा गेम केला हे सुद्धा आम्ही सांगू शकतो, अशी सूचक टिप्पणी करत रोहित पवार यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील राजकीय वातावरण तापले असून आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे.